## ऋ ण नि र्दे श

शिवाजी विद्यापीठाच्या एम्. फिल्. ( शिक्षणशास्त्र ) या पदवीच्या पूर्ततेसाठी संशोधन कार्य म्हणून प्रस्तुतचा लघुशोध निबंध शिवाजी विद्यापीठास सादर करताना संशोधिकेला मनस्वी आनंद होत आहे.

प्रस्तुत संशोधन कार्य पार पाडताना आवश्यक ती प्रेरणा व जिद्द निर्माण करणारे प्राचार्य पी. एल्. नानकर यांची संशोधिका सदैव ऋणी राहील.

या संशोधन कार्यात संशोधन पद्धती व अहवाल लेखन, शास्त्र संदर्भातील सखोल मार्गदर्शन संशोधिकेचे मार्गदर्शक डॉ. ब. आ. कोळपे यांच्याकडून लाभले. प्रा. वंदना जाधव व डॉ. के. डी. गायकवाड यांचेकडून संशोधिकेस प्रश्नावली तयार करण्याच्या संदर्भात अचूक मार्गदर्शन मिळाले. प्रा. जी. बी. कांबळे यांनी मौलिक मदत केली. संशोधिकेला गुरूस्थानी असलेल्या सर्व सहका-यांचे या संशोधनाच्या पूर्ततेसाठी बहुमोल मार्गदर्शन व सहकार्य केले. संशोधिका सर्वांची अंतःकरणपूर्वक ऋणी आहे. कार्यालीन सेवकांनी केलेल्या मदतीबद्दलही संशोधिका त्यांची ऋणी आहे.

प्रस्तुत संशोधनाच्या संदर्भात माहिती उपलब्ध होण्यास आझाद कॉलेज ऑफ एज्युकेशनचे ग्रंथपाल श्री. एस्. आर्. गोडसे यांची मोलाची मदत झाली तसेच मुलाखत व प्रश्नावली या माध्यमातून आपल्या मौल्यवान प्रतिक्रिया देणा-या सर्वच प्रतिसादकांची संशोधिका ऋणी राहील.

या लघुशोध निबंधास सुबक व आकर्षक इलेक्ट्रॉनिक टापपिंग व बाईंडिंग करून असे मोहक रूप देण्याची जबाबदारी ' क्वालिटी सायक्लोस्टाईलिंग, सातारा ' च्या संचालिका सौ. शोभना खिरे यांनी समथपणे पेलली. या निमित्ताने संशोधिका त्यांचीही ऋणी आहे.

याशिवाय अनावधानाने राहिलेल्या सर्व व्यक्ती व संस्थांची संशोधिका ऋणी आहे.

सातारा : दिनांक : 31.12.95 सौ. पाटील मंगला श्रीधर.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR